# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

प्रशासकीय इमारत, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ०१३
दूरध्वनी - ०२२-४३२२६८०८/८१२ ई मेल – mlwbcivil@gmail.com


---

जा.क्र.मका/बांधकाम/२०२२/१८३ दिनांक : ३०/०७/२०२२

## जाहीर प्रकटन

विषय – आर्चरी ट्रेनिंग सेंटर व रायफल शुटींग ट्रेनिंग सेंटर उभारणीच्या स्थापत्य कामांचे नियोजन करण्यासाठी वास्तुविशारद नियुक्त करणेबाबत.

संदर्भ - क्र.मकाक १२/२०२१/प्र.क्र.२६५/कामगार-१० दि.२६ जुलै, २०२२

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या १) हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथील मैदानात आर्चरी ट्रेनिंग सेंटर व २) मंडळाच्या प्रशासकीय इमारत, प्रभादेवी, मुंबई येथील बेसमेंटमध्ये रायफल शुटींग ट्रेनिंग सेंटर उभारण्याचे प्रस्तावित आहे. या दोन्ही ट्रेनिंग सेंटर्स उभारणीच्या स्थापत्य कामांचे नियोजन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिका अथवा तत्सम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत वास्तुविशारद यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

वरील नमूद दोन्ही ट्रेनिंग सेंटर्सची उभारणी मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीने (डीपीडीसी) उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून करण्यात येत आहेत. ट्रेनिंग सेंटर्स उभारणीची स्थापत्य कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून राज्य दरसूची (एस.एस.आर) नुसार करुन घ्यावयाची आहेत. कामांची अंदाजपत्रके तयार करणे, प्राप्त अंदाजपत्रकांनुसार दरपत्रक / ई निविदा कागदपत्रे तयार करणे, ई निविदेशी संबंधित तांत्रिक बाबींची पुर्तता करणे, कामांवर प्रत्यक्ष देखरेख ठेवणे, कामांची देयके प्रमाणित करणे व इतर अनुषंगिक कामे वास्तुविशारद यांनी करावयाची आहेत. दरपत्रक सादर करण्यापुर्वी विषयांकीत जागेची पाहणी करुन कामाचा आवाका लक्षात घ्यावा व त्यानंतर दरपत्रक सादर करावे. महाराष्ट्र शासनाचे सर्व अनुषंगिक अधिनियम/नियम/निकष यांच्या अधीन राहून ठेकेदारांकडून दुरुस्ती कामे करुन घेण्याची जबाबदारी वास्तुविशारद यांची राहील.

दरपत्रकासोबत वास्तुविशारद यांचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व इतर आवश्यक कागदपत्रे जोडावीत. मंडळाच्या प्रशासकीय इमारत, प्रभादेवी, मुंबई येथे दि.०८/०८/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावे. प्राप्त दरपत्रके शक्य झाल्यास दि.०८/०८/२०२२ रोजी दुपारी ३ वाजता उघडण्यात येतील. प्राप्त दरपत्रकासंदर्भात अथवा इतर कोणत्याही कारणास्तव वाद / समस्या निर्माण झाल्यास अंतिम

निर्णय घेण्याचा अधिकार कल्याण आयुक्त यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे. कोणतेही कारण न देता कोणतेही एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा / स्विकारण्याचा अधिकार मंडळ प्रशासन राखून ठेवत आहे.

(रविराज इळवे)
कल्याण आयुक्त